"A++" Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय :- "उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार" च्या सुधारीत नियमावलीबाबत.**

सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक यांना आदेशावरुन कळविण्यात येते की, सन २०१९ पासून शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिनी दरवर्षी दिनांक १८ नोव्हेंबर रोजी विज्ञान व अभियांत्रिकी अधिविभागांमधून एका अधिविभागास व अन्य अधिविभागांमधून एका अधिविभागास "उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार" देण्यात येतो. सदर पुरस्कारासाठी निवड झालेल्या अधिविभागांना पुरस्काराची प्रत्येकी रक्कम रुपये १०,००,०००/- (रूपये दहा लाख फक्त) प्रदान करण्यात येते.

सदर पुरस्काराच्या नियमावलीमध्ये पुरस्कार रक्कमेच्या विनियोगाबाबत दिनांक ०४ मार्च, २०२५ रोजी आयोजित केलेल्या व्यवस्थापन परिषदेच्या ठराव क्रमांक ३२ व्दारे प्रचलित नियमावलीमध्ये सुधारणा केली असून ती सोबत माहितीसाठी व पुढील उचित कार्यवाहीसाठी जोडली आहे.

सदर सुधारीत नियमावली सन २०२४ च्या पुरस्कारापासून लागू करण्यात आली असून पुरस्कार प्राप्त अधिविभागांनी त्यानुसार पुरस्कार रक्कमेचा विनियोग करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त व लेखा विभागास सादर करण्याबाबतची कार्यवाही करावी.

**जा. क्र. आस्थापना/पी.जी./** 571
**दिनांक :-** 14 MAY 2025

**कुलसचिव**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**प्रति,**

अधिविभागप्रमुख / संचालक / समन्वयक,
सर्व अधिविभाग / स्कूल / केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**प्रत,**

- इंटरनेट विभागास :- सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द् करावे.

Estd. 1962

"A++" Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## "उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार" नियमावली

१. विज्ञान व अभियांत्रिकी अधिविभागामधून एका अधिविभागास आणि अन्य अधिविभागामधून एका विभागास "उत्कृष्ट अधिविभाग पुरस्कार" देण्यात येईल.

२. सदर पुरस्काराचे स्वरूप प्रत्येकी रक्कम रूपये 10,00,000/- (दहा लाख रुपये), स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र असे राहील.

३. सदर पुरस्कारासाठी विहित नमुन्याप्रमाणे (<u>Best Department Proforma</u>) व विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे अनिवार्य राहील.

४. तसेच अर्जांची Hard Copy आवश्यक त्या कागदपत्रांसह सादर करणे अनिवार्य राहील.

५. निवड प्रक्रियेमध्ये समितीचा निर्णय अंतिम राहील.

६. ही योजना विद्यापीठातील सर्व अधिविभागांना लागू राहील.

७. जे शिक्षक एकापेक्षा अधिक अधिविभागांमध्ये कार्यरत आहेत. त्यांचे योगदान त्यांच्या मूळ अधिविभागामध्ये ग्राहय धरण्यात येईल. तथापि, अधिकचा कार्यभार दिलेल्या अधिविभागांमध्ये त्यांचे योगदान असल्यास ते त्या अधिविभागांतर्गत ग्राहय धरण्यात येईल.

८. एकदा पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर त्या अधिविभागास पुढील तीन वर्षापर्यंत या पुरस्कारासाठी अर्ज सादर करता येणार नाही.

९. विद्यापीठातील सर्व अधिविभागांनी या पुरस्कार योजनेमध्ये सहभाग घेणे अनिवार्य आहे.

१०. दिनांक ०१ ऑगस्ट ते दिनांक ३१ ऑगस्ट या कालावधीमध्ये सदर पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात येतील.

११. सदर पुरस्कार हा दरवर्षी माहे सप्टेंबर मध्ये जाहिर करण्यात येईल व विद्यापीठाच्या वर्धापनदिनी दिनांक १८ नोव्हेंबरला प्रदान करण्यात येईल.

१२. एखाद्या वर्षी पुरस्कारासाठी अधिविभाग / अधिविभागांची निवड न झाल्यास अथवा तरतूद शिल्लक राहिल्यास त्या वर्षीचा निधी मूळ विद्यापीठ निधीमध्ये वर्ग करण्यात येईल.

१३. पुरस्कार प्राप्त अधिविभागाने पुरस्कार रक्कमेचा विनियोग अधिविभाग वृध्दिंगणासाठी अनावर्ती खर्च (Non-Recurring Expenditure) स्वरूपात करावयाचा आहे. पुरस्कार जाहिर झाल्यानंतर दिनांक १८ नोव्हेंबर ते दिनांक ३१ मार्च या कालावधीत संबधित अधिविभागाने खर्चासाठीचा प्रस्ताव सादर करून प्रशासकीय मान्यता घ्यावी. नंतर लगतच्या पुढील आर्थिक वर्षाच्या कालावधीत पुरस्काराची रक्कम खर्च करणे आवश्यक आहे. विहित कालावधीमध्ये रक्कम अखर्चित राहिल्यास ती विद्यापीठ निधीत जमा करण्यात यावी.

१४. पुरस्कार निवड समिती स्वईच्छेने कोणत्याही अधिविभागास भेट देवू शकेल.

१५. पुरस्कार योजनेअंतर्गत अर्ज केलेल्या प्रत्येक अधिविभागांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा संच अधिविभागात जतन करणे आवश्यक आहे.

१६. सदर नियमावलीबाबतीत कोणत्याही प्रकारची संदिग्धता, अस्पष्टपणा किंवा अडचण निर्माण झाली तर त्या बाबतीत अंतिम निर्णय मा. कुलगुरू यांचा राहील.

**कुलसचिव**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**जा. क्र. आस्थापना/पी.जी./** 571-1
**दिनांक :-** 14 MAY 2025

**प्रति,**

अधिविभागप्रमुख / संचालक / समन्वयक,
सर्व अधिविभाग / स्कूल / केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.